# जागतिक प्रार्थना दिन - २०२२

## शुक्रवार, ४ मार्च २०२२

**विषय : तुम्हांविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो.**

**यिर्मया २९:१ ते १४**

**इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या 'जागतीक प्रार्थनादिन' समिती कृत.**

# शास्त्राभ्यास

## माहितीपूर्ण प्रार्थना - प्रार्थनापूर्वक कृती

**इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या देशाच्या स्त्रियांबरोबर या प्रार्थनेत भाग घेणाऱ्या जगातील सर्व स्त्रिया, पुरुष,मुले, युवक यांना ही प्रार्थना फलदायी ठरो अशी आमची प्रार्थना आहे.**

# जागतिक प्रार्थना दिन - २०२२

## शुक्रवार, ४ मार्च २०२२

**विषय : तुम्हांविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो.**

**यिर्मया २९:१ ते १४**

**इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड**

**या जागतीक प्रार्थनादिन समिती कृत.**

# शास्त्राभ्यास

## पूर्वतयारी

बायबल अभ्यास रचनात्मक, सर्जनशील गट - संभाषण होण्यासाठी तयार केले गेले आहे.

शास्त्रभाग वाचा, ऐका मनन व चिंतन करा.

गटअभ्यास, गटसंभाषण करण्यासाठी कठपुतली, देखावा, पार्श्वसंगीत, बायबलसंबधी नकाशा, जुन्या व नव्या कराराच्या काळातील जगाचा नकाशा बंदिवासातील अनुभव - परिस्थितीचे फोटो आगाऊ तयार करा.

देव, आपली आई व आपला पिता यावर एक वचन वाचा.

### सुरूवातीची प्रार्थना

देवा, आमची आई व पित्या व आज तुम्ही तुझ्या चरणापाशी आलो आहोत. तुझे सत्य वचन ऐकण्यासाठी आमचे कान उघड आमच्या जीवनाच्या चांगल्या योजना स्विकारण्यासाठी आमचे मन तयार कर. देवा आम्ही तुझ्यावर प्रेम करतो व तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमच्यासाठी जगात पाठविला त्याबद्दल तुझे आभारी आहोत. आमेन.

# पार्श्व देखावा

ख्रिस्तपूर्व सातवे शतक हे इस्त्राएल यहुदा व सभोवतालच्या देशासाठी गोंधळाचा काळ होता. क्रूर अश्शूर साम्राज्याने इस्त्राएलाचा पाडाव करून ते एक अपयशी राज्य ठरवले होते. अश्शूरावर शक्तिशाली बाबिलोनी लोकांचा प्रभाव होता अशा या अस्थिर जगात यिर्मयचा जन्म ख्रिस्तपुर्व ६५० मध्ये झाला होता.

यिर्मया मातेच्या गर्भाशयात घडत असतानाच देवाने त्याची निवड केली होती व त्याला पवित्र केले होते. एक महत्वाचा राष्ट्राचा संदेष्टा म्हणून त्याची नेमणूक केली होती. ख्रिस्तपूर्व ६२७ मध्ये यिर्मयाला संदेश देण्यासाठी पाचारण झाले होते. तरूण यिर्मया हया महान कार्यासाठी तयार नव्हता. परंतु देवाने त्याच्या मुखास स्पर्श केला व वचने त्याच्या मुखात घातली. देवाने त्याला करावयाच्या कार्यासाठी सामर्थ्य देण्याचे आश्वासन दिले. (यिर्मया १:४-१०) यिर्मयासाठी हा निर्णायक कसोटीचा काळ होता. त्यात आशा होती, संकटाचे सावटही होते. त्याला मोठया धैर्याची आवश्यकता होती.

हया वर्षीच्या जागतिक प्रार्थना दिनासाठी निवडलेल्या अध्यायात यिर्मयाला सततच्या विरोधाला, खडतर जीवनाला, लोकांच्या असंतोषाला तोड कसे द्यावे लागले याचा उल्लेख आहे.

यहूदाचे राज्य बाबिलोनच्या (आधुनिक काळातील इराक) ताब्यात गेले. बाबिलोनने यरूशलेमावर हल्ला केला व सत्ता काबीज केली. यरूशलेमाचा विनाश झाला, उध्वस्त झाले यहूद्यांना हद्दपार केले.

बऱ्याच कारागिरांना आणि यहुदी पुढाऱ्यांनाही राजा, राणि व राणिची आई इतरांना पकडून बाबिलोनला नेले व कैदेत टाकले याच सुमारास यिर्मयाचे पुस्तक लिहिले गेले.

स्त्रोत्र १३७ मध्ये यरुशलेमकरांची निराशाजनक मनोवृत्ती, त्यांचा आकांत, अंधुक भविष्य व यरुशलेमेला परत जाण्याची तीव्र इच्छा दर्शविली आहे.

बंदिवासात असताना. मंदिराशिवाय ते यज्ञ व बलीचे अर्पण करु शकत नव्हते. त्यामुळे पापापासून शुध्द होत नसत. हा त्यांच्या श्रध्देचा एक भाग होता.

## शास्त्रपाठवाचन : यिर्मया २९: 1 ते 14 वाचा

## वाचने, ऐकणे आणि मनन करण्याचे मार्ग

- यिर्मयाचा उतारा २/३ वेळा मोठयाने वाचा प्रत्येक वचनावर चिंतन मनन करा देवाचे वचन तुमच्या अत:करणाला स्पर्शू द्या.
- बाहुल्या, कठपुतळया, पार्श्वसंगीताचा वापरु करुन वाचन नाटयरुपात करा.
- २1 व्या शतकातील बाबिलोन आणि जेरूशेलमेचे भौगोलिक क्षेत्र नकाशावर पहा निर्वासित लोकांच्या जीवनाचा प्रवास, त्यांच्यासाठी देवाच्या योजनाचा शोध द्या.
- आपल्या स्वत:च्या जीवनाबद्दल चर्चा आणि समाजाच्या आशा एकत्र करा.
- निर्वासित, कैदी, वृध्द, बेरोजगार, एकटे, बेघर समाजातून हद्दपार करणाऱ्यांना काय वाटते याची कल्पना करण्याचा प्रयत्न करा.

निवडलेला उतारा हे  एक पत्र आहे. ज्यात बंदिवानांसाठी यिर्मयाला देवाचा संदेश आहे. यिर्मयाने बंदिवानास घरे बांधून त्यात वस्ती करण्यास, नगराचे हित बघण्यास कुटुंबाची वाढ करण्यास सांगितले (बागा, मुळे लावून त्यांची फळे खाण्यास) जेथे देवाने त्यांना राहण्यासाठी पाठवले होते तेथे

खोटया संदेष्टयांचे, भविष्य सांगण्याचे ऐकू नये असे बजावले. ते स्वत:च्या घरी बाबेलास लवकरच परत जातील असे आश्वासन, वचन ही देवाने त्यांना दिले.

देवाचा संदेश स्पष्ट होता. तुम्ही ज्या देशात शहरात / राज्यात राहतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

स्थायिक होण्यासाठी त्या ठिकाणची सद्य परिस्थिती स्वीकारण्यास तयार रहा. तुमचे कल्याण होईल.

## आपल्यासाठी विचार आणि प्रश्न

- ❖ परदेशात स्थायिक होण्यासाठी तयार असले पाहिजे या बातमीवर बंदिवानांनी काय प्रतिक्रिया दिली? आपली प्रतिक्रिया काय असेल?
- ❖ घरी परत येण्यापूर्वी त्यांना कोणत्या अटी पाळाव्या लागल्या?
- ❖ देवाच्या योजना ऐकल्यानंतर आपल्याला काय वाटते?
- ❖ देव लोकांना त्यांच्या स्वत:च्या भूमीवर परत आणण्याचे वचन विसरला नव्हता. परंतु ७० वर्षे? हे पत्र वाचून बंदिवानांची स्वप्ने भगली असावीत. पुढची पिढी यहुदात आपल्या घरी जाईल आपण नाही, आशाभंग झाल्यासारखे वाटले असेल.

# आशा आणि भविष्य

देवाच्या शब्दांमध्ये आशा होती. यहूदातील लोंकाना, देवाबरोबरचे त्यांचे नाते पुन्हा निर्माण करावे लागले. जे पाप आणि आज्ञांचे उल्लंघन केल्यामुळे तुटले होते. जेव्हा त्यांनी प्रार्थना आणि उपासनेद्वारे मनापासून देवाचा शोध घेतला. तेव्हा ते नाते त्यांना सापडले.

त्यांनी स्थानिक रहिवाशांशी संबंध निर्माण करावा अशीही देवाची इच्छा होती. हे ते सामुदायिक आणि प्रार्थनापूर्वक कृतीतून साध्य करतील. बाबेलमध्ये त्यांची वाट पाहण्याची वेळ कठिण आणि निराशाजनक असेल. परंतु जेव्हा हा काळ संपेल तेव्हा त्यांचे भविष्य पुन:स्थापित केले जाईल. आणि त्यांचे कुटुंब देवाने वचन दिल्याप्रमाणे त्यांचा मायदेशी परंतू शकतील.

## आजच्या जगासाठी आशा

आजच्या जगात लाखो लोक युध्द,छळ, भीती आणि ,उपासमारीमुळे आपला देश सोडून परदेशी गेले आहेत. इतरांना हे एक धोकादायक व कठिण वाटते. परंतु अशांना त्यांच्यासाठी ते सुरक्षित स्थान वाटते. भविष्यात ते आपल्या घरी परत येण्याची शक्यता फारच कमी आहे. असे बऱ्याच जणांना वाटते.

## तुमच्यासाठी विचार

- स्वत:च्या देशात सुरक्षित असून परदेशी गेलेल्यांना हद्दपार झाल्यासारखे वाटते का?
- परदेशी गेलेल्यांसाठी आपण कशी प्रार्थना करू?
- परिस्थितीतून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही असे वाटणाऱ्यांना आपण आशा कशी निर्माण करू शकतो?

# प्रार्थनापूवर्क कृती :-

यिर्मयाच्या पत्राने त्या काळातील राजकीय आणि सामजिक तणाव उघड केला. तसेच त्यांना त्यांच्या भविष्यासाठी मार्गदर्शन करण्याचे वचन देखील दिले.

‘‘तुम्हांविषयी जे संकल्प आहेत ते मी जाणतो.’’

जे सर्वात असुरक्षित आहेत, जिथे अन्याय आहे अशा समाजासाठी काम करण्याची गरज आहे.

जागतिक तापमान वाढ, दारिद्रय, संसर्गजन्य रोग, जबरदस्तीचे स्थलांतर, निर्वासित संकट व प्रेमाचा अभाव यासारख्या मोठया समस्यांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला जगभरात एकत्र काम करण्याची गरज आहे. पण एकत्र येण्यासाठी आपण तयार आहोत का

देव नेहमी आपल्या सोबत असतो हे आपल्या समजण्यापलीकडे असते.

देवाची आपल्या प्रत्येकांसाठी चांगली योजना आखतो. हा आपला विश्वास आहे. आता भविष्याची ही आशा कृतीत आणण्याची आपली वेळ आली आहे. आपण त्यासाठी तयार आहोत का?

# प्रार्थनापूर्वक कृतीची एक कथा :

मी ग्रेस आहे. २४ वर्षाची

माझी आशा आहे......

जे यूके मध्ये सुरक्षितता शोधतात त्यांचे स्वागत मिठी मारून केले जाते. गरजेच्या वेळी आधार दिला जातो.

**ग्रेस :** भूमध्यसमुद्र ओलांडून युरोपमध्ये पोहोचण्यासाठी आपला जीव धोक्यात घातला हया यूकेमधील दाखविण्यात आलेल्या बातम्यांकडे मी दुर्लक्ष करू शकले नाही. माझे हृदय भग्र झाले, लोकांना त्यांची घरे सोडून पळ काढावा लागला. आमच्या खंडात पोचण्यासाठी जीव धोक्यात घालावा लागला.

माझा देव, न्यायी देव आहे. अन्याय माझ्या दारात घडत होता. मी सप्टेंबर २०१७ मध्ये शरणार्थी कम्युनिटी किचनमध्ये स्वय:सेवक म्हणून कॅलिसला गेले. मी, ड्रायव्हर आणि डिस्ट्रीब्युशन लिडर म्हणुन ६ महिने काम केले.

देवाने मला आश्चर्यकारक रितीने आधार दिला.

कॅलिसमधील लोकांचा व माझ्या कुटुंबाचा ही आधार मिळाला.

माझ्या मैत्रीमध्ये शरणार्थींना आशेचा किरण दिसला.....

## जागतिक प्रार्थनादिनाची अपेक्षा काय आहे?

- ग्रेसची आशा निर्वासितांना धीर देण्यात होती.
- तीने कृतीद्वारे प्रेमाने शरणार्थीची / निर्वासितांची सेवा केली.
- अन्यायाचे न्यायात रूपांतर करण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलू शकता?

आम्हाला जगभरात उत्साही आशा देणाऱ्यांची चळवळ निर्माण करावयाची आहे.

यिर्मयाच्या या वचनाद्वारे प्रेरित होवू या, विश्वास ठेवा देव आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी एक परिपूर्ण योजना आणेल.

हे देवा आमची आई, वडिल व इतरांना जेव्हा जीवन कठीण वाटत असेल तेव्हा त्यांना सहाय्य करण्यास आमचा वापर कर.

..........................................................................................

भाषांतर : उज्वला अनिल रेड्डी
मुंबई धर्मप्रात महिला मंडळ
सी.एन्.आय्.

# जागतीक प्रार्थना दिनांचे चिन्ह

जागतीक प्रार्थना दिनांचे चिन्ह हे आयर्लंड येथील स्त्रियांनी सुरू केले व ते १९८२ मध्ये अंतरराष्ट्रीय चिन्ह म्हणून मान्य केले गेले दरवर्षी मार्च महिन्यांच्या पहिल्या शुक्रवारी ही विशेष भक्ती महिला चालवतात.  सर्व मंडळी उपासनेत सहभागी होतात. १७० देशातील लोक यात भाग घेतात. माहितीपूर्ण प्रार्थना व प्रार्थनापूर्वक कृती या या बीद्र वाक्याद्वारे ऐकमेकांशी वर्षभर संबध प्रस्थापित होतात.





पहिले प्रतिक - चारहि दिशांकडून केद्रभागी बाण दाखवले.

दुसरे प्रतिक - गुडघे टेकून प्रार्थना करणारी व्यक्ती

तिसरे प्रतिक - जगातील सर्व भाषिकांचे एकत्रिकरण

चौथे प्रतिक - वर्तुळ म्हणजे जग

पाचवे प्रतिक - यामध्ये वरील सर्व प्रतिक एकात एक गुंफलेली आहेत.

**कॉपीराइट २०२२ जागतीक प्रार्थना दिवस आंतरराष्ट्रीय समिती**

इंग्लंड, वेल्स आणि नॉर्दन आयर्लंडच्या जागतिक प्रार्थना समितीने २०२२ च्या जागतिक प्रार्थना दिनासाठी आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी ''माझ्या मनांत जे संकल्प ते मी जाणतो'' यावर हे तयार केल्या आहेत. राष्ट्रीय किंवा स्थानिक समित्या आणि त्यांच्या भागीदार संस्थानी आयोजित केलेल्या डब्लु डी पी कार्यक्रमांच्या विशेष वापरासाठी जागतिक प्रार्थना दिवस साहित्य विकसित केले आहे. इतर कोणत्याही वापरासाठी, जागतिक दिवस २०२२ संसाधन पॅकेटमधील साहित्य जागतिक प्रार्थना

आंतरराष्ट्रीय समिती (WDPIC) च्या परवानगीशिवाय पुनरुत्पादित केले जाऊ शकत नाही.

**मर्यादित पुनरुत्पादन अधिकार** - बायबल अभ्यास, उपासना सेवा, देशाची पाश्र्वभुमी, मुलांचा कार्यक्रम, कलाकृती आणि कलाकारांचे विधान, जागतिक प्रार्थना दिवस साठी रचना केलेली गाणी आणि छायाचित्र पुनरुत्पादित केली जाऊ शकतात मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक जागतिक प्रार्थना दिवस मंडळे आणि गटासह जागतिक प्रार्थना दिवसासाठी योग्य श्रेय दिल्यास. जागतिक प्रार्थना दिवस राष्ट्रीय / प्रादेशिक समित्यांना जागतिक प्रार्थना दिवस कार्यक्रमाच्या उद्‌देशाने संसाधनांचे पुनरुत्पादन पुन्हा विकण्याची परवानगी आहे.

(WDPIC) शी संबंधित जागतिक प्रार्थना दिवस राष्ट्रीय / प्रादेशिक समित्याच संसाधन पॅकेट किंवा साहित्याचे विभाग ऑनलाईन उपलब्ध करु शकतात. ऑनलाईन उपलब्ध साहित्य उपलब्ध करुन देणाऱ्या समित्यांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की ऑनलाईन साहित्य वापरणारे गट आणि व्यक्ती समितीला जबाबदार आहेत.

या सेवेसाठी आणि मुलांच्या कार्यक्रमासाठी सुचवलेली कॉपीराईट केलेली माहिती समाविष्ट करतात. गाण्याचे पुनरूत्पादन किंवा भाषांतर करण्याची परवानगी प्रकाशकांकडुन मिळणे आवश्यक आहे. डब्ल्युडीपीआयसी फक्त मूळ गाणी डब्लूपीपी कार्यक्रमांसाठी तयार केलेली गाणी पुनरूत्पादित किंवा भाषांतर करण्याची परवानगी प्रकाशकांकडून मिळणे आवश्यक आहे. डब्ल्युडीपीआयसी फक्त मूळ गाणी डब्ल्यूपीपी कार्यक्रमांसाठी तयार केलेली गाणी पुनरूत्पादित किंवा अनुवादित करण्याची परवानगी देते.

जगतिक प्रार्थना दिवस उपक्रमांशी संबंधित कोणतेही अर्पण किंवा निधी गोळा करताना. जागतिक प्रार्थना दिवस समित्यांना कळवावे.

पवित्र शास्त्रातीती कोटेशन बायबलच्या नवीन सुधारित मानक आवृत्तीचे आहेत. कॉपीराईट १९८९ मध्ये यूएसए मधील नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस ऑफ क्राइस्टच्या ख्रिश्चन शिक्षणाच्या विभागाने आणि परवानगीने वापरले जातात. सर्व हक्क राखीव अधिक माहितीसाठी, कृपया संपर्क साधा.

जागतिक प्रार्थना दिवस आंतरराष्ट्रीय समिती

४७५ रिव्हरसाइड ड्राइव्ह रूम ७२९

न्यूयॉर्क, न्यूयॉर्क १०११५ यूएसए